157

क्रमांक : प्राधिकरण/१०/२[illegible]/७७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
कार्यालय, १८ वा मजला, नवीन प्रशासकीय
भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई नं. ४०० ०२१.

दिनांक : १७ मे, १९७७.

सोबत प्राधिकरणाच्या 30 मार्च, १९७७ रोजी भरलेल्या दहाव्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत जोडली आहे.

( कार्यवृत्ताची इंग्रजी प्रत या अगोदरच्या दिनांक 30 एप्रिल, १९७७ च्या पत्रान्वये पाठवण्यात आली आहे.)

स्टाफ ऑफिसर.

प्रति,
सर्व सदस्य.

पवार/-
१२.५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ३० मार्च १९७७ रोजी

भरलेल्या दहाव्या बैठकीचे कार्यवृत्त

बैठकीस उपस्थित असलेले सदस्य व निमंत्रित व्यक्ती यांची सूची सोबत जोडपत्र 'अ' येथे दिली आहे.

२. बैठकीच्या प्रारंभी, अध्यक्षांनी दिवंगत राष्ट्रपति फखुद्दिन अली अहमद आणि राज्यपाल श्री. अलियावर जंग यांच्या दुःखद निधनाचा उल्लेख केला. नंतर दिवंगत राष्ट्रपति व दिवंगत राज्यपाल यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे सर्व जण स्तब्ध राहिले.

त्यानंतर, अध्यक्षांनी श्री. जी.एन्.बनातवाला व श्री. डी.बी.पाटील यांची लोकसभेवर निवड झाली असल्यामुळे ते प्राधिकरणाचे सदस्य म्हणून यापुढे राहणार नसल्याने त्यांनी केलेल्या सेवेचा गौरवपूर्वक उल्लेख केला. त्यांनी श्री. पी.के. सावंत, उद्योग मंत्री, श्री. बी.एन्.अडारकर, अध्यक्ष, परिवहन व संचारण मंडळ, आणि श्री. एम्.जी.पुनूस, महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे या नवीन सदस्यांचेही स्वागत केले.

३. त्यानंतर कार्यसूचीवरील बाबी चर्चेसाठी घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : मागील (नवव्या) बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे

प्रस्ताव ११८ : मागील (नवव्या) दिनांक २४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

बाब क्र. २ : मागील बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

करण्यात आलेल्या कार्यवाहीची पुढील गोष्टींच्या अधीन राहून नोंद घेण्यात आली :-

ठराव ८४ : ठाणे खाडीपलीकडील क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या
(सातवी बैठक) ताब्यातील रिकाम्या क्षेत्राचा वापर करणे.

क्षेत्र (झोन) एक मधील युनिटस ठाणे खाडीपलीकडील क्षेत्रात हलवण्यासाठी कोणत्याही सवलती न देण्याच्या शासनाच्या निर्णयाचा फेरविचार करण्यात यावा असा अनेक सदस्यांनी आग्रह धरला होता. क्षेत्र एक मधील उद्योगधंदे हलवण्यासाठी कोणत्या सोयी व सवलती देता येतील यावर विचार करण्यासाठी सर्व संबंधित विभागांची एक बैठक बोलावण्यात येईल असे उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

ठराव १०२ : बांद्रा – कुर्ला कॉम्प्लेक्स
(आठवी बैठक)

बांद्रा – कुर्ला कॉम्प्लेक्सच्या जमीनीचा वापर करण्याची योजना आणि त्यासंबंधीची इतर तपशिलवार माहिती तयार झाल्याबरोबर ती प्राधिकरणासमोर मांडण्यात येईल असे काही सदस्यांनी केलेल्या विचारणेस उत्तर देतांना महानगर प्रदेश आयुक्तांनी स्पष्ट केले.

बाब क्र. ३ : १९७७-७८ चे वार्षिक अर्थसंकल्पिय अंदाज

अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी अनेक सदस्यांनी अनेक अभिप्राय/सूचना व्यक्त केल्या. सद्याच्या परिस्थितीत फिरत्या निधीमधून, ज्यातून उत्पन्न मिळू शकेल केवळ अश्याच योजना हाती घ्याव्यात, आणि ज्यातून उत्पन्न मिळू शकत नाहीत आणि समाजकल्याणाभिमुख अशा, पाणी पुरवठा व गटारे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गटासाठी आणि कमी उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण इत्यादि योजना, पुरेसे आर्थिक बळ प्राप्त झाल्यावरच हाती घेण्यात याव्यात, या शासनाच्या धोरणाचा अध्यक्षांनी पुनरुच्चार केला. अर्थसंकल्पाच्या चर्चेला उत्तर देतांना महानगर ~~प्रदेश~~ आयुक्तांनी सदस्यांचे, त्यांनी

......२/-

केलेल्या विधायक सूचनांबाबत आभार मानले आणि पुढील मुद्दे मांडले :-

(एक) हा अर्थसंकल्प, प्राधिकरणाने आपल्या मागच्या (नवव्या) बैठकीत मान्य केलेल्या वार्षिक कामांच्या कार्यक्रमाशी (वर्क प्रोग्रॅम) निगडित होता. अर्थसंकल्पास जोडलेल्या विवरणपत्र "अ" मध्ये पुढील बाबींचा तपशील दिलेला होता :- जमीनींचा विकास (क्षेत्रनिहाय आणि विकास करावयाचे एकरी क्षेत्र), "जागा व सेवा" (साईडस् अ‍ॅण्ड सर्विसेस) "नागरी नवीकरण" आणि "गृहनिर्माण युनिटस्" याविषयीच्या योजना. यापुढील काळात अर्थसंकल्पासोबत एक स्पष्टीकरणात्मक निवेदन जोडण्यात येईल. अर्थसंकल्पाच्या नमुन्यांमध्येसुध्दा योग्य ते बदल करणे आवश्यक आहे, आणि ही गोष्ट राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

(दोन) क्षेत्रातील विकासाचे नियोजन आणि समन्वय हे प्राधिकरणाच्या कार्यापैकी प्रमुख कार्य होते, आणि त्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गावरील खर्च आवश्यक असला तरी प्रत्यक्ष भांडवली खर्चाचे स्वरुपात त्याची फलनिष्पत्ती दिसून येणार नाही. त्याशिवाय, आस्थापनेवरील अंदाजित खर्च हा भांडवली खर्चाच्या केवळ सहा टक्केच होता. आणि तत्सम काम करणा-या इतर संस्था किंवा सरकारी विभाग यामधील खर्चाशी तुलना करता हा ६ टक्के खर्च योग्यच होता असे दिसून येते.

(तीन) आस्थापना खर्च हा फिरत्या निधीमधून खर्च खाती टाकणे अयोग्य असले तरी ज्यामधून आस्थापना खर्च भागवता येईल असे कोणतेही साधन सध्या प्राधिकरणाकडे नाही. पुरेसे प्रकल्प हाती घेण्यात आल्यानंतर आस्थापना खर्च आणि प्रशासनिक खर्च (किंवा त्यावरील बराचसा खर्च) या प्रकल्पांच्या खर्चखाती टाकता येणे शक्य आहे तोपर्यंत हा प्रश्न शिल्लक राहिल. हा प्रश्न योग्य रितीने सोडवण्यासाठी राज्य सरकारशी या प्रश्नाबाबत चर्चा करण्याचे योजिले आहे.

(चार) केवळ, बृहन्मुंबई, ठाणे आणि कुलाबा या जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन आणि विकास परिषदा यांच्याशी, त्या जिल्हा योजनांना अंतिम स्वरुप देण्यापुरता संबंध ठेवून, किंवा अधिनियमाच्या कलम १८(एक)(अ) अन्वये त्यांच्यासाठी प्राधिकरणामार्फत केवळ निधीची तरतूद करण्याची व्यवस्था करुन, मुंबई महानगर प्रदेशातील नियोजन व समन्वय करणारी संस्था म्हणून प्राधिकरणाला आपली भूमिका परिणामकारकरित्या बजावता येणार नाही. प्राधिकरणाने महानगर प्रदेशाकडे एकात्म नियोजन विभाग म्हणून पाहिले पाहिजे आणि त्यानुसार त्या प्रदेशाच्या विकासाची योजना तयार केली पाहिजे. त्यासाठी नागरी विकास योजनांच्या संदर्भात संपूर्ण महानगर प्रदेशासाठी एकमेव नियोजन व विकास परिषद म्हणून या प्राधिकरणाची नेमणूक करण्यात यावी, आणि राज्य सरकारच्या संमतीने, या प्राधिकरणाला, या तीन जिल्ह्यांकरता उपलब्ध असलेला निधी नियोजन व विकास यासाठी देण्यात यावा. या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(पाच) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या तरतुदीनुसार एक लेव्ही आकारण्याच्या प्रस्तावाचा अभ्यास चालू आहे.

(सहा) अध्यक्षांनी उल्लेख केलेल्या वित्तविषयक निर्बंधांमुळे, प्राधिकरणाला, मुंबई महानगर-पालिकेच्या हद्दीबाहेरील क्षेत्रांमधील पाणीपुरवठा व गटार योजनांना तात्काळ सहाय्य देता येणार नाही. परंतु जलसंपत्ति व्यवस्थापन मंडळ, हे मुंबई महा-नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध असलेल्या सोयींच्या पातळीवरील सोयी मुंबई महानगर प्रदेशात इतरत्र करण्यासाठी, पहिला टप्पा म्हणून १५ वर्षांच्या एका पर्सपेक्टिव्ह योजनेचा आराखडा आधीपासूनच तयार करीत आहे. ही योजना तयार झाल्यानंतर, राज्य सरकार व भारतसरकार यांच्याकडे, या योजना मुंबई महानगर

प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत किंवा इतर प्रकारे अंमलात आणण्यासाठी, सहाय्यासाठी मागणी करण्यात येईल. त्यानंतर पुढील ठराव स्वीकृत करण्यात आला.

ठराव ११७ :- असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर प्रदेश प्राधिकरणाकडे जमा झालेल्या व त्याने खर्च केलेल्या रकमा दर्शवणारे १९७७-७८ या वित्तीय वर्षाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज १९७६-७७ चे सुधारित अंदाज हे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २३(१) अन्वये संमत करण्यात आले आहेत.

बाब क्र. ४ : नवीन-मुंबईसाठी विकास योजनेचा मसुदा

नवीन मुंबईतील, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्राच्या प्रश्नावर ~~इत्यादी~~ उद्योग विभागाने विचार केल्यानंतरच, ही बाब विचारार्थ घेण्यात यावी अशी इच्छा उद्योग मंत्र्यांनी व्यक्त केल्यामुळे त्यांच्या सूचनेवरुन ही बाब लांबणीवर टाकण्यात आली.

नवीन टिप्पणीसह ही बाब कार्यसूचीवर पुन्हा घेण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. अधिसूचित क्षेत्र, गावांची यादी इत्यादी संबंधीची माहिती सिडकोने सादर करावी.

बाब क्र. ५ : नागरी कला आयोगाची कार्ये पार पाडण्यासाठी एक नामसूची (पॅनेल) तयार करणे.

मुख्य सचिवांनी, अध्यक्ष, गृहनिर्माण नागरी नवीकरण व पारिस्थितिकी मंडळ, भारत सरकारच्या बांधकाम व गृहनिर्माण मंत्रालयाचे सहसचिव (श्री. गोपालस्वामी), महानगर प्रदेश आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका, आणि नगरविकास व आरोग्य विभाग यांच्याशी चर्चा करुन या प्रश्नाची आणखी तपासणी करावी असा निर्णय घेण्यात आला.

बाब क्र. ६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(सेवेच्या शर्ती) विनियम, १९७७.

विनियम ४ चा खंड (एक) हा, ज्या पदांच्या वेतन श्रेणीतील कमाल वेतन रुपये १,०००/- पेक्षा अधिक आहे त्या पदांवरील नेमणुकीच्या बाबतीतच लागू करण्यात यावा या सुधारणेसह वरील विनियम स्वीकारण्यात आले. पुढील ठराव स्वीकारण्यात आला.

ठराव ११८ : स्थायी समितीने दिनांक २१ मार्च १९७७ रोजीच्या आपल्या सातव्या बैठकीमध्ये तयार करुन शिफारस केलेले व आपल्या बाब क्र. ४८ मध्ये मांडलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या शर्ती) विनियम, १९७७ च्या मसुद्यास पुढील एका फेरफारास अधीन राहून संमती देण्यात आली, असा ठराव करण्यात येत आहे तो फेरफार असा :-

विनियम ४च्या खंड (एक) मधील "प्रतिनियुक्तीवरील नेमणुकी व्यतिरिक्त सर्व नेमणुका" या ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

"ज्या पदांच्या वेतन श्रेणतील कमाल वेतन रु. १,०००/- पेक्षा अधिक असेल अशा (प्रतिनियुक्तीवरील नेमणुकाव्यतिरिक्त) इतर सर्व नेमणुका"

हे विनियम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ५० अन्वये प्राधिकरणाने तयार केल्याचे समजण्यात येईल.

बाब क्र. ७ : भूतपूर्व महानगर प्रदेश आयुक्त श्री. के. व्ही. शेषाद्रि यांच्या परदेश प्रवासासाठी दैनिक भत्ता व विशेष भत्ता मंजूर करणे

पुढील ठराव स्वीकृत करण्यात आला :-

<u>ठराव ११९</u> :- असा ठराव करण्यात येत आहे की, श्री. के.व्ही. शेषाद्रि, भूतपूर्व महानगर प्रदेश आयुक्त यांनी ऑगष्ट - सप्टेंबर १९७८ मध्ये परदेशात केलेल्या प्रवासासाठी पुढे दर्शविल्या प्रमाणे, दैनिक भत्ता व विशेष भत्ता यांच्या रकमा काढण्यास <u>कार्योत्तर मंजुरी</u> देण्यात यावी व ती याप्रमाणे देण्यात आली आहे.:-

| | | |
|---|---|---|
| (१) वॉशिंग्टन येथील मुक्कामासाठी दैनिक भत्ता | : | अमेरिकन $ ९८ |
| (२) अभ्यास दौ-यासाठी दैनिक भत्ता | : | अमेरिकन $ ४० |
| (३) विशेष भत्ता (करमणुकीसाठी) | : | अमेरिकन $ २०० |

पवार/-
७.५.

जोडपत्र 'अ'

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३० मार्च, १९७७ रोजी भरलेल्या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची**

डॉ. रफिक झकेरिया, नगर विकासमंत्री

श्री. मनोहर जोशी, मुंबईचे महापौर,
श्री. पी. के. सावंत, उद्योगमंत्री,
श्री. जे. बी. डिसोझा, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव,
श्री. हशु अडवानी, मुंबई.
श्री. एस्. डी. बसवंत, विधान परिषद सदस्य, शहापूर.
श्री. हंस भुगरा, मुंबई.
श्री. सी. एम्. कोरिया, अध्यक्ष, हाऊस अर्बन रिन्युअल ॲन्ड एकॉलॉजी बोर्ड.
श्री. आर्. के. चिंबुलकर, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगर पालिका.
श्री. बी. जी. देशमुख, महानगर पालिका आयुक्त, मुंबई महानगर पालिका.
श्री. एस्.एस्. दिघे, विधानसभा सदस्य, मुंबई.
श्री. आर्. गोपालस्वामी, केंद्र शासनाच्या बांधकाम व गृहनिर्माण मंत्रालयाचे सहसचिव.
श्री. ए. एल्. गुप्ता, महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
श्री. सुधीर जोशी, मुंबई.
श्री. एम्. ए. हांडवानी, मुंबई.
श्री. सोहनसिंग कोहली, मुंबई.
श्रीमती लिलीबेन पंड्या, अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगर पालिका.
डॉ. एम्. जी. परुळेकर, अध्यक्ष, वसई नगरपालिका.
श्री. डी. एन्. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, पनवेल.
श्री. नकुल पी. पाटील, विधानसभा सदस्य, डोंबिवली.
श्री. व्ही. के. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी.
श्री. एस्. डब्ल्यु. पटवारी, अध्यक्ष, डोंबिवली नगरपालिका.
श्रीमती कमला रामन, विधानसभा सदस्य, मुंबई.
श्री. व्ही. के. टेंबे, विधानसभा सदस्य, मुंबई.
श्रीमती ताराबाई वर्तक, अध्यक्ष, जिल्हा परिषद, ठाणे.
श्री. एच्.एम्. वंगारे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, कुलाबा.
श्री. बी. एन्. अडारकर, अध्यक्ष, वहातुक आणि दळणवळण मंडळ.
श्री. पी. व्ही. नायक, महानगर आयुक्त.
सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (निमंत्रित)
व्यवस्थापकीय संचालक, सिडको (निमंत्रित)
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (निमंत्रित)
श्री. पी. बी. केरकर, महाव्यवस्थापक, बी.ई.एस्.टी. (निमंत्रित)

No. BMRDA/10/2439/77.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
18th floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp. Mantralaya,
Bombay - 400 021.

(165)

Date : 30th April, 1977.

The minutes of the tenth meeting of the Authority held on the 30th March, 1977 are enclosed.

2. A Marathi translation will follow.

Staff Officer.

To:

All Members and permanent invitees
copies to all Officers of the BMRDA.

§§§§§§§§§§§

p:30.4.

# MINUTES OF THE TENTH MEETING OF THE B.M.R.D.A. HELD ON THE 30TH MARCH, 77.

The list of members and invitees present is at Annexure 'A'.

2. The Chairman at the outset referred to the sad demise of the late President, Shri Fakhruddin Ali Ahmed, and the late Governor, Shri Ali Yavar Jung. Silence was observed for two minutes in homage to the late President and the late Governor.

The Chairman then placed on record the appreciation of the services of Shri G.N. Banatwala and Shri D.B. Patil, who had ceased to be members of the Authority after their election to the Lok Sabha. He also welcomed the new members, viz., Shri P.K. Sawant, Minister for Industries, Shri B.N. Adarkar, Chairman, Transport and Communications Board, and Shri M.G. Punoose, General Manager, Western Railway.

3. The items on the agenda were then taken up for discussion.

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (Ninth) meeting.

RESOLUTION 116: The minutes of the last (Ninth) meeting, held on the 24th January, 1977, were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last meeting.

The action taken was noted, subject to the following :-

RESOLUTION 84 : Utilisation of vacant area in possession of (Seventh Meeting) the MIDC in the trans-Thane creek area.

A number of members urged reconsideration of the Government decision not to give any concession to the shifting units from Zone I to the trans-Thane creek area. The Minister, Industries, stated that he would convene a meeting of all the concerned Departments and agencies to consider what could be done to facilitate the movement of industrial units from Zone I.

RESOLUTION 102 : Bandra-Kurla Complex. (Eighth meeting)

The Metropolitan Commissioner clarified in response to the queries by some members that the land use plan and other related details of the Bandra-Kurla Complex would be placed before the Authority, when they were ready.

Item No. 3 : Annual Budget Estimates for 1977-78.

In the course of the discussion on the Budget estimates, many members made several observations/suggestions, and the Chairman reiterated the Government policy that the Authority should at this stage undertake only remunerative schemes from the Revolving Fund and take up non-remunerative and socially oriented schemes like water supply and sewerage, housing for the E.W.S. and L.I.G., etc. only after substantial resources were built up. In reply to the Budget discussion, the Metropolitan Commissioner thanked the members for their constructive suggestions, and made the following points -

(i) The Budget was related to the Annual Works Programme, which had been approved by the Authority in its last (Ninth) meeting. The Statement 'A' accompanying the Budget gave details of (i) the development of lands (areawise and the acreage to be developed); and (ii) the schemes of 'Sites and Services', 'Urban Renewal' and 'Housing Units'. An explanatory memorandum would be attached to the Budget in future. The Budget forms were also required to be amended suitably, and this was under the consideration of the State Government.

(ii) Planning and coordination of the development in the Region was one of the main functions of the Authority, and the expenditure on the staff engaged therein did not yield results in physical terms of capital expenditure by the Authority. Despite this, the estimated expenditure on establishment worked out to only about six per cent of the estimated capital outlay, and this compared favourably with other agencies or Government Departments doing similar work.

(iii) While the establishment charges could not appropriately be debited to the Revolving Fund, the Authority did not have at present any other sources from which the establishment charges could be met. This problem was likely to persist until sufficient projects could be taken in hand, and the establishment and administrative expenditure (or at least the bulk of it) could be debited to the projects. It was proposed to discuss this

matter with the State Government for finding an appropriate solution.

(iv) The role of the Authority as a planning and coordinating body in the Bombay Metropolitan Region could not be discharged effectively merely by the Authority being associated with the District Planning and Development Councils of Greater Bombay, Thane and Kulaba in finalizing the District Plans for these districts, or by notionally channelising the funds under Section 18(1) (a) of the Act through the Authority. It was necessary that the Authority should look upon the Metropolitan Region as an integral unit and plan for the development of the Region on that basis. This would be facilitated if the Authority was made a Planning and Development Council for the Metropolitan Region as a whole in respect of the Urban sector schemes and the funds earmarked for the purpose in the 3 District Plans were made available to the Authority for planning and development with the approval of the State Government. This proposal was being processed.

(v) Some studies were already in progress in regard to proposals for levy of a cess under the provisions of the B.M.R.D.A. Act.

(vi) The financial constraints mentioned by the Chairman would not permit the Authority to assist immediately schemes of water supply and sewerage in the areas outside the limits of the Bombay Municipal Corporation but the Water Resources Management Board was already preparing the I Phase component of a 15 year perspective aimed at bringing these amenities on a par with those obtaining in the Municipal Corporation area. When this plan was ready, the State Government as well as the Central Government would be moved for assistance in executing the schemes through the BMRDA or otherwise.

The following Resolution was then adopted :-

RESOLUTION 117 :- Resolved that the Annual Budget Estimates for the financial year 1977-78 and the Revised Estimates for

1976-77, showing the estimated receipts and disbursement of the Metropolitan Authority, are approved under Section 23(1) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974.

Item No. 4 : Draft Development Plan for New-Bombay.

The item was deferred on the suggestion of the Minister (INDS.), who desired that it should be considered after his Department had examined the question regarding MIDC industrial area in New Bombay.

It was decided that the item be placed on the agenda again with a fresh note. The CIDCO should furnish the data regarding the area notified, list of villages, etc.

Item No. 5 : Setting up of a Panel to perform the functions of an Urban Art Commission.

It was decided that the Chief Secretary should examine the matter further in consultation with the Chairman, HURE Board, Joint Secretary to the Government of India, Ministry of Works and Housing (Shri Gopalswami), Metropolitan Commissioner, Bombay Metropolitan Region Development Authority, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation and the Urban Development and Public Health Department.

Item No. 6 : The B.M.R.D.A. (Conditions of Service) Regulations, 1977.

It was decided that the Regulations should be adopted with the modification that clause (1) of Regulation 4 should apply only to the appointments to posts, the max ima of the scales of pay of which exceed Rs.1000/-. The following --- Resolution was then adopted.

RESOLUTION 118 :- Resolved that the draft Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service) -- Regulations, 1977, as prepared and recommended by the Standing Committee in its Seventh meeting held on the 21st March, 1977, by its Resolution No. 46, are approved, subject to one modification, viz., in clause (i) of Regulation 4, for the words "all appointments otherwise than on deputation", the following words and brackets should be substituted :-

"all appointments (otherwise than on deputation) to posts the maxima of the scales of pay of which exceed Rs.1000".

(171)



These Regulations shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the B.M.R.D.A. Act, 1974.

Item No. 7 : Grant of Daily Allowance and Special Allowance for tour abroad of the Ex-Metropolitan Commissioner, Shri K. V. Seshadri.

The following Resolution was adopted :-

RESOLUTION 119 :- Resolved that post facto approval be and is hereby given to the drawal of daily allowance and special allowance by Shri K.V. Seshadri, Ex-Metropolitan Commissioner, for his overseas tour during August-September, 1976, as shown below :-

| | |
|---|---|
| 1) Daily allowance for stay at Washington. | : U.S. $ 96 |
| 2) Daily allowance for study tour. | : U.S. $ 40 |
| 3) Special allowance (for entertainment) | : U.S. $ 200. |

$$$$$$$$$$$

Vp:29.4.

Annexure 'A'

List of members present at the meeting of the B.M.R.D.A., held on the 30th March, 1977.

Dr. Rafiq Zakaria,
Minister, Urban Development & Public Health Department,
Mantralaya, Bombay - 400 032.

Shri Manohar G. Joshi,
Mayor of Bombay.

Shri P. K. Sawant,
Minister for Industries,
Mantralaya, Bombay - 400 032.

Shri J.B. D'Souza,
Chief Secretary to Government,
General Administration Department,
Mantralaya, Bombay - 400 032.

Shri Hashu Advani,
Bombay.

Shri S.D. Baswant, M.L.C.
Shahapur.

Shri Hans Bhugra,
Bombay.

Shri C.M. Correa,
Chairman, Housing, Urban Renewal &
Ecology Board.

Shri R.K. Chimbulkar,
Chairman, Improvements Committee,
Bombay Municipal Corporation,
Bombay - 400 001.

Shri B.G. Deshmukh,
Municipal Commissioner,
Bombay Municipal Corporation,
Bombay - 400 001.

Shri S.S. Dighe, M.L.A.
Bombay.

Shri R. Gopalswami,
Joint Secretary, Government of India,
Ministry of Works & Housing,
New Delhi.

Shri A.L. Gupta,
General Manager, Central Railway,
Bombay.

Shri Sudhir Joshi,
Bombay.

Shri M.A. Khandwani,
Bombay.

Shri Sohan Singh Kohli,
Bombay.

Smt. Lilyben Pandya,
Chairman, Standing Committee,
Bombay Municipal Corporation,
Bombay - 400 001.

Dr. M.G. Parulekar,
President, Vasai Municipal Council.

Shri D.N. Patil,
Chairman, Panchayat Samiti,
Panvel.

Shri Nakul P. Patil, M.L.A.
Dombivali.

Shri V.K. Patil,
Chairman, Panchayat Samiti,
Bhiwandi.

Shri S.W. Patwari,
President, Dombivali Municipal Council.

Smt. Kamala Raman, M.L.A.
Bombay.

Shri V.K. Tembe, M.L.A.
Bombay.

Smt. Tarabai Vartak,
President, Zilla Parishad,
Thane.

Shri H.M. Wangere,
President, Zilla Parishad,
Kolaba.

Shri B.N. Adarkar,
Chairman, Transport & Communications Board.
Shri P.V. Nayak, Metropolitan Commissioner.
Secretary to Government Urban Development.
(invitee)

Managing Director, C.I.D.C.O.
(invitee)

Chief Executive Officer, M.I.D.C.
(invitee)

P.B. Kerkar,
General Manager, B.E.S.T.
(invitee)

Vp:1.4.